## संक्षिप्त

### ‘जदयू’च्या के.सी. त्यागी यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** संयुक्त जनता दलाचे (जदयू) नेते के.सी. त्यागी यांनी मंगळवारी पक्षाचा राजीनामा दिल्याची माहिती दिली. पुढील निर्णय लवकरच घेऊ असे त्यांनी सांगितले. ऑक्टोबर २००३मध्ये समता पक्ष आणि जनता दलाचे विलिनीकरण होऊन ‘जदयू’ची स्थापना झाली तेव्हापासून त्यागी पक्षाबरोबर होते. त्यांनी पक्षामध्ये मुख्य सरचिटणीस, मुख्य प्रवक्ते आणि राजकीय सल्लागार अशा विविध पदांवर काम केले. ते राज्यसभेचेही सदस्य होते. विचारसरणीच्या मुद्द्यावर हा निर्णय घेतल्याचे त्यागी यांनी सांगितले.

### वांगचुक यांना तोडग्याची अपेक्षा

नवी दिल्ली : लडाखमधील आंदोलकांच्या मागण्यांवर सकारात्मक दृष्टीकोनातून तोडगा निघेल, अशी अपेक्षा पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली. यावेळी त्यांच्या पत्नी गीतांजली आंगमो उपस्थित होत्या. वांगचुक म्हणाले, ‘‘लडाखमध्ये आंदोलनाचा उद्देश केवळ रचनात्मक संवाद प्रक्रिया सुरू करणे हा आहे. आम्हाला न्यायालयात काही प्रमाणात यश मिळाले, पण ते पुरेसे नाही.’’

### हरदीपसिंग पुरींच्या मुलीला दिलासा

**नवी दिल्ली :** लैंगिक शोषणाचे आरोप सिद्ध झालेला मृत अमेरिकी अब्जाधीश जेफ्री एप्स्टीन याच्याशी केंद्रीय मंत्री हरदीपसिंह पुरी यांच्या मुलीचा संबंध असल्याचे दाखवणारी सामग्री समाजमाध्यमांवरून हटवावी असे निर्देश दिल्ली उच्च न्यायालयाने मंगळवारी दिली. त्यासाठी उच्च न्यायालयाने २४ तासांची मुदत दिली आहे.

### गंगेत इफ्तारचे आयोजन केल्याने अटक

**वाराणसी :** वाराणसीत गंगा नदीमध्ये एका बोटीत इफ्तार मेजवानीचे आयोजन केले आणि त्यामध्ये चिकन बिर्याणीचे सेवन केले या आरोपावरून १४ जणांना अटक करण्यात आली आहे. या मेजवानीदरम्यान चित्रीकरण करून त्याची चित्रफीत जाणीवपूर्वक प्रसिद्ध करून धार्मिक भावना दुखावल्या असा आरोप करत भाजप युवा मोर्चाचे शहरप्रमुख रजत जयस्वाल यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

### उना मारहाणप्रकरणी पाच वर्षांची शिक्षा

**गीर सोमनाथ (गुजरात) :** गुजरातच्या उनामधील चाबकाने मारहाण प्रकरणात विशेष न्यायालयाने मंगळवारी पाच आरोपींना प्रत्येकी पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. याशिवाय प्रत्येकी पाच हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. २०१६मध्ये चार दलित तरुणांना मृत गायीची कातडी काढत असताना निर्दयीपणे मारहाण करण्यात आली होती. या घटनेचे चित्रीकरण समाजमाध्यमात प्रसारित झाल्यानंतर देशभर संताप व्यक्त झाला होता.

# इराणचे दोन वरिष्ठ अधिकारी ठार

## इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांचा दावा

**एपी, दुबई**



अली लारिजानी



जन. सोलेमनी

**इराणचे उच्च** स्तरावरील सुरक्षा अधिकारी आणि ‘रिव्होल्युशनरी गार्ड’चे बसिज गटाचे प्रमुख मारले गेले असल्याचा दावा इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांनी मंगळवारी केला. इराणने इस्रायल आणि शेजारी आखाती देशांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोनचा मारा मंगळवारीही सुरूच ठेवला.

इस्रायलचे संरक्षणमंत्री इस्रायल काट्झ यांनी सांगितले, की इराणचे सुरक्षा अधिकारी अली लारिजानी आणि जनरल गुलाम रझा सोलेमनी सोमवारी रात्री इस्रायलने केलेल्या हल्ल्यात ठार झाले. इराणकडून अद्याप अधिकृतपणे कुठलीही माहिती जाहीर करण्यात आलेली नाही.

इस्रायलने सोमवारी रात्री तेहरान आणि लेबनॉनमधील हेजबोला गटावर जोरदार हल्ले केले. हेजबोला गटाने इस्रायलच्या उत्तरेला लक्ष्य केल्याचे काट्झ यांनी सांगितले. इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे दुबईचे हवाई क्षेत्र तात्पुरते बंद करावे लागले, तर अबुधाबीमध्ये एकाचा मृत्यू झाला. इराकमधील अमेरिकेच्या दूतावासावर दोन ड्रोन डागले.

दरम्यान, इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला मोजताबा खामेनी यांनी तणाव निवळण्यासाठी मध्यस्थानी दिलेले प्रस्ताव धुडकावले आहेत. ‘‘अमेरिका आणि इस्रायलला गुडघे टेकायला लावू,’’ अशी प्रतिक्रिया इराणच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने मंगळवारी दिली. दोन देशांनी मध्यस्थीचा प्रयत्न केल्याची माहिती एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर दिली. मोजताबा खामेनी यांनी अमेरिका आणि इस्रायलला धडा शिकविण्याची भूमिका घेतली होती.

**‘‘मोजताबा रशियात नाहीत’’**

**मॉस्को :** इराणचे सर्वोच्च नेते आयातुल्ला मोजताबा खामेनी यांच्यावर मॉस्कोमध्ये उपचार सुरू असल्याची माहिती खोटी आहे, असे स्पष्टीकरण इराणचे रशियातील राजदूर काझेम जलाली यांनी दिली. युद्धात मोजताबा जखमी झाल्याने त्यांना मॉस्कोला हलविण्यात आल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते.







### युद्ध लांबल्यास भुकेच्या संकटाचा इशारा

**जिनिव्हा :** युद्ध जूनपर्यंत लांबल्यास लाखो लोकांना भुकेच्या संकटाचा सामना करावा लागेल, असा इशारा ‘वर्ल्ड फूड प्रोग्राम’ने दिला. मानवतावादी मदत पोहोचवण्यासाठी वापरले जाणारे महत्त्वाचे मार्ग युद्धामुळे बंद झाले आहेत. त्यामुळे अन्न, तेल आणि जहाजवाहतुकीचा खर्ज वाढून साडेचार कोटी लोकांसमोरील भुकेची समस्या वाढेल, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

## भारताची दुसरी नौका ‘नंदा देवी’ गुजरातमध्ये

**पीटीआय, अहमदाबाद**

**भारताची दुसरी** नौका ‘नंदा देवी’ होर्मुझ सामुद्रधुनीतून ४६,५०० टन द्रवीभूत पेट्रोलियम वायू (एलपीजी) घेऊन गुजरातच्या वाडिनार बंदरात मंगळवारी दाखल झाली. यापूर्वी ‘शिवालिक’ नौका सोमवारी मुंद्रा बंदरावर दाखल झाली होती. सध्या भारताच्या २२ नौका पर्शियन आखातात अडकून पडल्या आहेत.

दीनदयाळ बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष सुशील कुमार सिंह यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, ‘‘एलपीजीचा ४६५०० टन साठा आला आहे. हा साठा बीडब्लू बर्च नौकेवर हलविण्यात येईल. त्यानंतर तमिळनाडूतील एन्नोर आणि पश्चिम बंगालमधील हल्दिया बंदरावर हा साठा उतरविण्यात येईल. एलपीजीचा साठा दुसऱ्या नौकेवर हलविण्यासाठी दोन दिवसांचा कालावधी लागेल. बंदर मंत्रालयाने ही सारी प्रक्रिया पूर्ण क्षमतेने अधिकाधिक परिणामकारकता राखून करण्यास सांगितली आहे.

# एलपीजीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर वाटाघाटी

## केंद्राच्या हमीनंतर याचिका निकाली

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** घरगुती ग्राहकांसाठी एलपीजी सिलिंडरच्या तुटवड्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आलेली याचिका निकाली काढण्यात आली. देशात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी केंद्र सरकारद्वारा देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्वतोपरी उपाययोजना तसेच वाटाघाटीचे प्रयत्न केले जात असल्याची हमी दिल्यानंतर न्यायालयाने हा निकाल दिला.

न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठासमोरी या याचिकेवर सुनावणी झाली. याप्रकरणी सहा एलपीजी वितरकांनी याचिका दाखल केली आहे. न्यायालयानेही याबाबत स्वतःहून याचिका दाखल करून घेण्याची तयारी केली होती. मात्र, केंद्र सरकारच्या हमीनंतर हा निर्णय मागे घेतला.

महान्यायअभिकर्ता जनरल तुषार मेहता यांनी शपथपत्र दाखल करत केंद्र सरकारची बाजू मांडली. आंतरराष्ट्रीय परिस्थितीत होत असलेल्या बदलांमुळे उद्भवणारा संभाव्य तुटवडा भारतावर परिणाम करू नये यासाठी केंद्र सरकार आवश्यक ती सर्व पावले उचलत असल्याचे त्यात म्हटले आहे. शपथपत्रात नमूद करण्यात आले की, ‘‘एलपीजीचा पुरवठा आणि वितरण सुरळीत राहावे यासाठी केंद्र सरकार देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्व प्रयत्न करत आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीत काही बदल होत असून त्यावर सरकार सतत लक्ष ठेवून आहे. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी आवश्यक ती सर्व सुधारात्मक पावले उचलली जात आहे.’’

### न्यायालयीन चर्चा नको

तुषार मेहता यांनी सुनावणीदरम्यान न्यायालयाला विनंती केली की, हा विषय राजनैतिक पातळीवर हाताळला जात असून सरकारवर विश्वास ठेवावा. यासंदर्भातील परिस्थिती सतत बदलणारी असल्याने देशहिताच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घेण्याचे अधिकार केंद्र सरकारकडेच राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, या विषयावर न्यायालयीन प्रक्रियेत सविस्तर चर्चा करणे योग्य ठरणार नाही, असेही शपथपत्रात नमूद करण्यात आले.

# ‘चाबहार’विषयी संसदीय समितीकडून चिंता व्यक्त

**पीटीआय, नवी दिल्ली**

**अलीकडाल घडामोडींमुळे** चाबहार बंदराच्या भवितव्यावर सावट पडले आहे, असे परराष्ट्र व्यवहारसंबंधी संसदीय समितीने म्हटले आहे. या घडामोडींच्या होणाऱ्या परिणामांवर उपाययोजना करण्यासाठी केंद्र सरकार सर्व संबंधितांशी चर्चा करत असल्याबद्दल प्रशंसा केली आहे. चाबहार हे इराणमधील बंदर असून भारतासाठी सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे.

पराष्ट्र मंत्रालयाच्या समितीचा २०२६-२७च्या अनुदान मागणीसंबंधीचा १२वा अहवाल मंगळवारी संसदेत सादर करण्यात आला. काँग्रेस खासदार शशी थरूर या समितीचे अध्यक्ष आहेत. पश्चिम आशियात सुरू असलेले युद्ध, तसेच भारताचा चाबहार प्रकल्पातील सहभाग कायम राहिल्यास निर्बंध लादण्याची अमेरिकेची धमकी या पार्श्वभूमीवर हा अहवाल मांडण्यात आल्यामुळे त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

### उद्दिष्टांसंबंधी दस्तऐवजाची शिफारस

परराष्ट्र धोरणाच्या उद्दिष्टांची मांडणी करणारा औपचारिक दस्तावेज तयार करण्याची शिफारस या समितीने केंद्राला केली आहे. परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे, ध्येय आणि दीर्घकालीन रणनीती स्पष्ट करणारा औपचारिक दस्तावेज नाही, असे समितीने नमूद केले.

# शिंदे–मोदी दीड तास चर्चा

## राजकीय तर्कवितर्कांना उधाण

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** विधिमंडळाचे अधिवेशन सुरू असताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली गाठून मंगळवारी संसदेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दीड तास चर्चा केली. शिंदेंनी अचानक सोमवारी रात्री दिल्लीत दाखल होत थेट मोदींशी भेट घेतल्यामुळे दिवसभर राजकीय तर्कवितर्क केले जात होते. मात्र, राज्याच्या महत्त्वाच्या प्रश्नांसंदर्भात मोदींशी चर्चा केल्याचे शिंदे यांनी पत्रकारांना सांगितले.

राज्यात गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या वेगवान राजकीय घडामोडी तसेच, स्थानिक स्वराज्य संस्था व राज्यसभा निवडणुकांनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी



पंतप्रधान मोदींची भेट घेतली आहे. त्याबाबत, मोदींबरोबर प्रदीर्घ व सकारात्मक बैठक झाल्याचे सांगतानाच, दिल्लीत आल्यावर माझ्यावर कोणी टीका केली तरी, मला हवे ते मी करत असतो, असे शिंदे म्हणाले.

शिवसेनेसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित खटलाही शिंदे गटासाठी तितकाच महत्त्वाचा मानला जात आहे. सर्वोच्च न्यायालयातील शिवसेना पक्ष व निवडणूक चिन्हासंदर्भात अंतिम सुनावणी लवकरच होणार आहे. त्या दृष्टीनेही या दिल्लीवारीकडे पाहिले जात आहे. मात्र, त्यांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी भेट झाली नाही.

### खासदारांची खरडपट्टी

पक्षाच्या काही खासदारांच्या कामगिरीबद्दल शिंदेंनी सोमवारी रात्री झालेल्या बैठकीमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली. केंद्रातील मंत्रिमंडळाच्या संभाव्य फेरबदलामध्ये स्थान मिळवण्यासाठी काही खासदारांची धडपड सुरू असल्याची चर्चा रंगली आहे. या खासदारांना शिंदेंनी चपराक दिल्याचे समजते. आधी काम करा, मग पदाची अपेक्षा ठेवा, असे शिंदेंनी खासदारांना ठणकावले.

# अटीतटीच्या लढतीत काँग्रेस उमेदवार विजयी

## राज्यसभा निवडणुकीत मतफुटीचा वाद

**चंडीगड, पीटीआय**

**हरियाणात राज्यसभेच्या** दोन जागांसाठी मध्यरात्रीपर्यंत राजकीय नाट्य रंगले. भाजपचे संजय भाटिया व काँग्रेसचे कर्मवीर सिंह बौध यांनी विजय मिळवला. मतफुटी, मतदानावेळी गोपनीयतेचा भंग असे आरोप करण्यात आले.

काँग्रेसचे बौध यांनी अपक्ष उमेदवार सतीश नंदल यांच्यावर चुरशीच्या लढतीत विजय मिळवला. राष्ट्रीय लोकदलाचे दोन सदस्य अनुपस्थित होते. पाच मते बाद झाली. यामध्ये काँग्रेसची चार तर भाजप एक मत होते. भाटिया यांना प्रथम पसंतीची ३९ मते मिळाली. बौध यांना २८ तर नंदल यांना १६ मते पडली.

काँग्रेसची पाच मते फुटल्याचा अंदाज आहे. पक्षाचा आदेश धुडाकावून मतदान करणाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाईल, असे पक्षाचे राज्य प्रभारी बी. के. हरिप्रसाद यांनी स्पष्ट केले.

### ओदिशात काँग्रेस आमदारांवर कारवाई

ओदिशातील राज्यसभा निवडणुकीत काँग्रेसच्या तीन आमदारांनी भाजप पुरस्कृत अपक्ष दिलीप रे यांना मतदान केले. त्यामुळे पक्षाने रमेशचंद्र जेना, दशरथी गोमांगो व सोफिया फिरदोस या तिघांना निलंबित केले.

# पाकिस्तानचा काबूलवर हल्ला

## रुग्णालयाला लक्ष्य केल्याने ४०० जणांचा मृत्यू झाल्याचा दावा

**पीटीआय, इस्लामाबाद**

**पाकिस्तानने सोमवारी** रात्री अफगाणिस्तानवर हवाई हल्ले करून पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. पाकिस्तानने काबूलमधील व्यसनमुक्ती पुनर्वसन रुग्णालयावर केलेल्या बॉम्बहल्ल्यात ४००पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाल्याचा दावा तालिबान सरकारने केला.

तालिबान सरकारचे उपप्रवक्ते हमदुल्ला फितरत यांनी सांगितले की, पाकिस्तानने पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. व्यसनमुक्ती पुनर्वसन रुग्णालयाचा मोठा भाग उद्ध्वस्त झाला असून बचाव पथके ढिगाऱ्याखालून मृतदेह बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत. या हल्ल्यात किमान ४०० नागरिकांचा मृत्यू झाला, तर २५० जण जखमी झाले, अशी माहिती त्यांनी दिली. हवाई हल्ल्यात रुग्णालय संकुलाच्या पाच इमारती उद्ध्वस्त झाल्या, जिथे सुमारे ३,००० रुग्णांवर उपचार सुरू होते, असे फितरत म्हणाले.

अफगाणिस्तानचे उपगृहमंत्री मुहम्मद नबी ओमारी यांनी घटनास्थळाला भेट दिली आणि या हल्ल्याचा तीव्र निषेध केला. पाकिस्तानने अफगाणी नागरिकांना ठार मारण्याचे प्रयत्न चालविले आहेत. पाकिस्तानच्या हल्ल्यांना जोरदार प्रत्युत्तर देण्यात येईल, असा इशारा ओमारी यांनी दिला.

पाकिस्तानने मात्र अफगाणिस्तानातील दहशतवादी तळांना लक्ष्य केल्याचा दावा केला.



### भारताकडून तीव्र निषेध

**संयुक्त राष्ट्रे :** शेजारील देशांमध्ये इस्लामद्वेषाच्या काल्पनिक कथा रचल्याबद्दल आणि रमजान महिन्यात अफगाणिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्याबद्दल संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत पाकिस्तानचा भारताने तीव्र शब्दांत निषेध केला. पाकिस्तानने नेहमीच आमच्या देशावर खोटे व तथ्यहीन आरोप केले आहेत. भारतात २० कोटींहून अधिक मुस्लीम राहतात. मात्र आमच्या देशात अत्याचाराच्या काल्पनिक कथा पाकिस्तानने रचल्या आहेत, असे स्थायी दूत पर्वथनेनी हरीश म्हणाले.

# असंसर्गजन्य आजारांचे वाढते संकट

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** भारतामध्ये असंसर्गजन्य आजारांचे वाढते प्रमाण हे सध्या सार्वजनिक आरोग्यासमोरील सर्वात मोठे आव्हान ठरत आहे. हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, उच्च रक्तदाब आणि श्वसनविकार यांसारखे आजार देशातील मृत्यू आणि अपंगत्वाचे प्रमुख कारण बनत असून, बदलती जीवनशैली आणि शहरीकरण यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

पूर्वी संसर्गजन्य रोग हे मृत्यूचे मुख्य कारण मानले जात होते. मात्र गेल्या दोन दशकांत जीवनशैलीशी संबंधित आजारांनी वेगाने वाढ घेतली आहे. विशेष म्हणजे, या आजारांचे प्रमाण आता ग्रामीण भागातही वाढताना दिसत आहे. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या (आयसीएमआर) अलीकडील अभ्यासानुसार, देशात सुमारे १० कोटींहून अधिक नागरिक मधुमेहाने ग्रस्त असून जवळपास १३ कोटी लोक प्री-डायबेटिक अवस्थेत आहेत. चिंताजनक बाब म्हणजे तरुणांमध्येही मधुमेह आणि उच्च रक्तदाबाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे.

तज्ज्ञांच्या मते ४० वर्षांखालील लोकांमध्ये जीवनशैलीजन्य आजारांचे प्रमाण पूर्वीपेक्षा दुपटीने वाढले आहे. कर्करोगाच्या रुग्णसंख्येतही सातत्याने वाढ होत आहे. आरोग्य अभ्यासानुसार, भारतातील प्रत्येक नऊपैकी एक व्यक्ती दीर्घकालीन असंसर्गजन्य आजाराशी झुंजत आहे. महाराष्ट्रासारख्या वेगाने शहरीकरण होत असलेल्या राज्यांमध्ये ही समस्या अधिक तीव्र होत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

असंसर्गजन्य आजारांचा आर्थिक परिणामही मोठा आहे. दीर्घकालीन उपचार, औषधोपचार आणि कामकाजातील घट यामुळे कुटुंबांवर आर्थिक ताण वाढत आहे.

### बदलत्या जीवनशैलीचा परिणाम

शहरी भागातील बैठी जीवनशैली, दीर्घ कामाचे तास आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे लठ्ठपणा वाढत असून तो अनेक गंभीर आजारांना आमंत्रण देत आहे. वाढते वायू प्रदूषण, फास्ट फूडचे वाढते सेवन आणि झोपेची कमतरता हीदेखील महत्त्वाची कारणे आहेत.

# गुजरातमध्ये लवकरच समान नागरी कायद्यासाठी विधेयक

**गांधीनगर :** गुजरातमध्ये समान नागरी कायदा लागू करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या पाच सदस्यांच्या समितीने आपला अंतिम अहवाल मंगळवारी मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडे सादर केला. सरकार सध्या सुरू असलेल्या विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातच यासंदर्भातील विधेयक मांडण्याची शक्यता आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश न्या. रंजना प्रकाश देसाई समितीच्या अध्यक्ष आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अभ्यास करून मसुदा विधेयक तयार करण्यासाठी फेब्रुवारीत या समितीची स्थापना करण्यात आली होती.

अहवालात विवाह, घटस्फोट, वारसा आणि दत्तक यांसारख्या मुद्द्यांवर सर्व धर्मांसाठी समान कायदेशीर चौकट सुचवण्यात आली आहे. विशेषतः लिंग समानता आणि महिलांच्या संरक्षणाला प्राधान्य देण्यात आले आहे, असे सरकारी प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या देशभर समान नागरी कायदा लागू करण्याच्या संकल्पपूर्तीसाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री पटेल म्हणाले.


**Reliance**
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, सेबीचे परिपत्रक क्रमांक: सेबी/एचओ/एमआयआरएसडी/डीओसी३/सीआयआर/पी/२०१८/१३९ दिनांक: ६ नोव्हेंबर, २०१८ नुसार, कंपनीपाशी हस्तांतरण करून घेणार/दावा करणार यांचेकडून खालील तपशिलानुसार भागधारका(कां)चे नावे असलेले खाली नमूद करण्यात आलेले समभाग, त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी विनंती प्राप्त झाली आहे.

| अनु. क्र. | दावा करणार/प्रस्तावित हस्तांतरण करून घेणार यांचे नाव व पत्ता | फोलिओ क्रमांक | नोंदणीकृत भागधारका(कां)चे नाव व पत्ता | प्रमाणपत्र क्रमांक | इक्विटी समभाग संख्या | विशिष्ट क्रमांक पासून | विशिष्ट क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सचिदा नंद जेजुसरिया तारिका साडीवाले, ६/१३४, विद्याधर नगर, जयपूर, राजस्थान ३०२०२३ | २४९६८३८३ | महावीर प्रसाद अग्रवाल द्वारा तारिका लालजी, सांड का रस्ता, चौरा रस्ता, जयपूर ३०२००३ | ५०५६९७५६ | ५ | ११६०७८५३९२ | ११६०७८५३९६ |
| २ | सुंदर कुप्पुसामी फ्लॅट ६, तृप्ती अपार्टमेंट्स, ठाकूरवाडी ऑटो स्टॅंड जवळ, क्रमांक १, डोंबिवली पश्चिम, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र ४२१२०२ | ३२१०१६०७ | व्ही. कुमार अय्यर के. मीनाक्षीसुंदरम अय्यर कुप्पुस्वामी तृप्ती अपार्टमेंट्स, फ्लॅट नं. ६, पहिला मजला, ठाकूरवाडी ऑटो स्टॅंड जवळ, डोंबिवली पश्चिम, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र ४२१२०२ | १२७११२०८<br>५०५४२१३७<br>६२०७२४८४<br>६६७३७६२७ | ४<br>४<br>८<br>१६ | २५७१९९०८०<br>११६०६६३२०८<br>२१८३१२६००५<br>६८८२७८५६३१ | २५७१९९०८३<br>११६०६६३२११<br>२१८३१२६०१२<br>६८८२७८५६४६ |
| ३ | जोगेश के वाशी शोभना एच वाशी ४४/२६१, विजय नगर फ्लॅट, पाटकर कॉलनी समोर, नारनपुरा, अहमदाबाद, गुजरात ३८००१३ | ११२०९४८१७ | उमेश टी देसाई मालीनी यू देसाई जोगेश के वाशी फ्लॅट नं. ४४/२६१, विजय नगर, नारनपुरा, अहमदाबाद, गुजरात ३८००१३ | ५७४५०६७६<br>६२३३२३०९<br>६६५६५४१३ | ४५<br>४५<br>९० | १५९२४२१६८४<br>२१९४९३५७५९<br>६८६५७८१८३७ | १५९२४२१७२८<br>२१९४९३५८०३<br>६८६५७८१९२६ |
| ४ | जोगेश के वाशी शोभना एच वाशी ४४/२६१, विजय नगर फ्लॅट, पाटकर कॉलनी समोर, नारनपुरा, अहमदाबाद, गुजरात ३८००१३ | ११२०९४८२५ | मालीनी यू देसाई उमेश टी देसाई जोगेश के वाशी फ्लॅट नं. ४४/२६१, विजय नगर, नारनपुरा, अहमदाबाद, गुजरात ३८००१३ | ५७४५०६७७<br>६२३३२३१०<br>६६५६५४१४ | ४५<br>४५<br>९० | १५९२४२१७२९<br>२१९४९३५८०४<br>६८६५७८१९२७ | १५९२४२१७७३<br>२१९४९३५८४८<br>६८६५७८२०१६ |
| ५ | जितेंद्रकुमार अग्रवाल २९, लक्ष्मी नगर, पार्क बुलंदशहर जवळ, उत्तर प्रदेश २०३००१ | १३१४१४४४ | उषा अगरवाल जे. के. अगरवाल आर. सी. अगरवाल घर क्र.१७/५७, आयकर कार्यालयाजवळ, ध्यान लोक कॉलनी, बुलंदशहर, उत्तर प्रदेश २०३००१ | १३३११६०७<br>१३३११६०८<br>५०६०४५६८ | ५<br>१<br>६ | २९२५३९३६२<br>२९२५३९३६७<br>११६०९६१८५० | २९२५३९३६६<br>२९२५३९३६७<br>११६०९६१८५५ |
| ६ | चंद्र मोहन शर्मा ४ दयानंद कॉलनी, गली क्रमांक ४, नागदा, जिल्हा उज्जैन, मध्य प्रदेश-४५६३३५ | १०४८६२८३० | राजेंद्र जैन ७१, एम.जी. रोड, नागदा जे एन, मध्य प्रदेश ४५६३३५ | ५८१२५७६५<br>६६७५५४७९ | ४५<br>९० | १६१२३२२३७३<br>६८८४१७६९८४ | १६१२३२२४१७<br>६८८४१७७०७३ |

हस्तांतरण करून घेणार/दावा करणार यांनी ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी संबंधित छापील स्वरूपातील समभाग खरेदी/संपादित केल्याचा दावा करण्यात आला होता आणि ते यापूर्वी हस्तांतरणासाठी सादर करण्यात आले नव्हते किंवा हस्तांतरणासाठी सादर करण्यात आले होते आणि कंपनीद्वारा आक्षेपासह परत पाठविण्यात आले होते.

कोणात्याही व्यक्तीला/व्यक्तींना या संदर्भात काही आक्षेप असल्यास, त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस (३०) दिवसांच्या आत कंपनीचे रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतरण एजंट म्हणजेच **‘‘केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड’’**, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१-३२, गचीबॉवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद – ५०० ०३२ यांच्याकडे आपला आक्षेप नोंदवावा, अन्यथा कंपनी उपरोक्त समभाग हस्तांतरित करण्याची कार्यवाही पूर्ण करेल.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : १८.०३.२०२६

www.ril.com